जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठतर्फे उद्या 'जीएसटी'वर खुले चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व इन्व्हेस्टर्स असोसिएशन यांच्या वतीने 'जीएसटी व आपण' या विषयावर सोमवारी (दि. १७) खुले चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी साडेचार वाजता चर्चासत्र असणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार असून, यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची



उपस्थिती असेल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'जीएसटी'मुळे सर्वच घटकांचा फायदा होणार आहे. ही करप्रणाली म्हणजे चांगला उपक्रम आहे. लोकांच्या मनातील या प्रणालीविषयीच्या प्रश्नांना उत्तरे मिळणार आहेत. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, अश्विनकुमार हुके, 'जीएसटी'चे उपआयुक्त सचिन जोशी, सी.ए. सुनील नागावकर आदी मार्गदर्शन करणार आहेत. जे. एफ. पाटील म्हणाले, 'जीएसटी'विषयी लोकांना माहिती देण्याचा हा चांगला उपक्रम आहे. केआयएचे मनीष झंवर म्हणाले, 'जीएसटी' करप्रणाली ही सर्वच घटकांना लाभदायक होणार आहे. डॉ. प्रा. विजय ककडे म्हणाले, विद्यापीठ लोकांत जाऊन 'जीएसटी'संदर्भात शंका आणि प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2017
लोकमत

# 'जीएसटी'विषयी खुल्या चर्चासत्राचे उद्या आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

◆ शिवाजी विद्यापीठ, केसीसी, 'केआयए'तर्फे आयोजन
◆ कुलगुरू शिंदे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स (केसीसी) आणि कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशन (केआयए) यांच्यातर्फे उद्या, सोमवारी 'जीएसटी आणि आपण' या विशेष खुल्या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शाहू स्मारक भवनमध्ये दुपारी ४.३० वाजता हे चर्चासत्र होणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. नांदवडेकर म्हणाले, केंद्र सरकारने १ जुलैपासून अमलात आणलेल्या वस्तू व सेवा कराविषयी नागरिकांच्या मनात अनेक शंका, संभ्रम आहेत. ते दूर करण्यासाठी नागरिकांसाठी कोल्हापूर शहरात विशेष चर्चासत्राचे आयोजन केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासन यांनी केसीसी व केआयए यांच्यातर्फे हे चर्चासत्र आयोजित केले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल.

यामध्ये ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, केंद्र सरकारच्या जीएसटी विभागाचे उपायुक्त अश्विनकुमार हुके, सी. ए. सुनील नागावकर, आदी मार्गदर्शन करणार आहेत. 'केआयए'चे अध्यक्ष मनीष झंवर, 'केसीसी'चे अध्यक्ष आनंदराव माने उपस्थित राहणार आहेत. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. विजय ककडे, मनीष झंवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2017

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातर्फे उद्या 'जीएसटी'वर चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स (केसीसी) आणि कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशन (केआयए) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, १७ जुलै रोजी वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटीविषयी सर्वसामान्य नागरिकांना सविस्तर माहिती करून देण्यासाठी 'जीएसटी आणि आपण' या विशेष खुल्या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. येथील शाहू स्मारक भवनमध्ये दुपारी साडेचार वाजता होणाऱ्या या चर्चासत्राचा नागरिकांनी राहून लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकार परिषदेत केले.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, केंद्र सरकारने १ जुलैपासून अमलात आणलेल्या वस्तू व सेवा कराविषयी नागरिकांच्या मनात अनेक शंका आहेत. त्या दूर करण्यासाठी नागरिकांसाठी विशेष चर्चासत्र आयोजित करण्याचे निर्देश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठातर्फे बँक ऑफ इंडिया, केसीसी व केआयए यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र आयोजित केले आहे. यामध्ये ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, केंद्र सरकारच्या जीएसटी विभागाचे उपायुक्त अश्विनकुमार हुके, सीए सुनील नागावकर आदी मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होणार आहे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, केआयएचे अध्यक्ष मनीष झंवर, केसीसीचे अध्यक्ष आनंदराव माने उपस्थित राहणार आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2017
महाराष्ट्र टाईम्स

# जीएसटीबाबत उद्या विद्यापीठात चर्चासत्र

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स (केसीसी) आणि कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशन (केआयए) यांच्यातर्फे सोमवारी (ता. १७) वस्तू व सेवा कर प्रणालीची (जीएसटी) सर्वसामान्यांना सोप्या पद्धतीने माहिती होण्यासाठी 'जीएसटी आणि आपण' हे विशेष खुले चर्चासत्र आयोजित केले आहेत. दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवनात सायंकाळी साडेचार वाजता चर्चासत्राची सुरुवात होईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जनसंपर्क कक्ष
16 JUL 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity to host seminar on GST on Monday

TIMES NEWS NETWORK

**Ashwinkumar Hukey from the central government and Sachin Joshi from the state government will speak on GST. J F Patil, veteran economist, will also be part of the seminar**

**Kolhapur:** A seminar on Goods and Services Tax (GST) will be held on Monday from 4.30 pm at Shahu Smarak Bhavan.

It is being organized by Shivaji University, Kolhapur (SUK), in association with Kolhapur Chamber of Commerce, Kolhapur Investors Association and Bank of India chair in rural banking.

According to university officials, the seminar is open to all and entry is free of charge.

According to Vilas Nandavadekar, registrar of SUK, Ashwinkumar Hukey from the central government and Sachin Joshi from the state government will speak on GST.

Nandavadekar said, "GST needs to be understood by the common man. Since there are seminars going on for traders and businessmen, we thought of organising a seminar for the people. Citizens can ask their questions at the seminar and clear their doubts."

He said, "Since it is an important topic, we are also thinking about organising the seminar in other SUK affiliated colleges. In all probability the lead colleges will be asked to conduct such lectures at the earliest."

He added that Monday's lecture will be put on the Shivaji University website for providing further access to citizens, students and scholars. It will also be broadcast live on the internet.

"We are aware that Monday's lecture needs to be replicated across the region for everyone's benefit, in order to make them aware of the new tax structure," he said.

J F Patil, veteran economist, who will also be part of the seminar, said that there are many interesting facts which are associated with the GST.

"The GST has waived off many indirect taxes and it was one of the initiatives which was long awaited by economists across the country. However some precautions need to be taken so that it all goes right," he added.

16 JUL 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'रवळनाथ'चे बँकेत रूपांतर व्हावे

## डॉ. क्रांतिकुमार पाटील : डॉ. मोरे, डॉ. रासम यांचा सत्कार

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : अनेकांच्या घरांची स्वप्ने सत्यात उतरणाऱ्या 'रवळनाथ'चे लवकरच बँकेत रूपांतर व्हावे. सेवेतून निवृत्तीनंतरही प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रा. डॉ. वासंती रासम यांनी शिक्षण क्षेत्रातील आपले काम पुढे सुरू ठेवावे, असे आवाहन ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले.

श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील शाखेच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित स्नेहमेळावा आणि सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्राचार्य डॉ. मोरे आणि प्रा. डॉ. रासम यांचा या वेळी सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार झाला. शिवाजी विद्यापीठाच्या 'बीसीयूडी'चे माजी संचालक, प्राचार्य म्हणून डॉ. मोरे यांनी केलेले कार्य, डॉ. रासम यांनी सामाजिक शास्त्रे विभागाच्या अधिष्ठाता म्हणून केलेल्या कार्याचा यानिमित्ताने गौरव झाला. त्याशिवाय त्यांच्या संघटनात्मक कामाचेही या वेळी कौतुक झाले.

डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचीही या वेळी भाषणे झाली. डॉ. रासम यांनी आई-वडिलांचे पाठबळ आणि पुढे शिक्षणातील संघर्षातून मिळवलेले यश याबाबतचे अनुभव शेअर केले.

शिक्षक हा कधी निवृत्त होत नसतो. त्याने अखेरपर्यंत आपले काम जबाबदारीने केलेच पाहिजे, असे डॉ. डी. आर. मोरे म्हणाले.

'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष प्रा. आर. एस. पाटील, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, डॉ. सतीश घाळी, अमृत सुतार, भास्कर सांगावकर, प्रा. डॉ. अण्णासाहेब कलगोंडा, प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी, प्रा. रवींद्र पोर्लेकर, विजय हरगुडे, शाखाधिकारी सुनील उत्तुरे आदी यावेळी उपस्थित होते.



कोल्हापूर : श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग फायनान्स सोसायटीतर्फे शनिवारी झालेल्या स्नेहमेळाव्यात प्रा. डॉ. वासंती रासम यांचा सत्कार करताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. या वेळी डावीकडून एम. एल. चौगुले, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्रा. आर. एस. पाटील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रमाच्या पुनर्प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत असणाऱ्या एमएस्सी कॉम्प्युटर सायन्स, एम.लिब., सायन्स अँन्ड इन्फॉर्मेशन सायन्स, एम. ए. मास कम्युनिकेशन, वायसीएसआरडी अभ्यासक्रम (एमबीए, एमआरएस, एम. टेक., एमएसडब्ल्यू) या अभ्यासक्रमांच्या रिक्त राहिलेल्या जागांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. १७ जुलै ते २१ जुलै या कालावधीत प्रवेश अर्ज भरण्याचा कालावधी आहे. प्रवेश परीक्षा २७ जुलै रोजी होणार आहे. ३१ जुलै रोजी गुणवत्ता यादी प्रसिध्द केली जाणार आहे. यानंतर १ ऑगस्टला संकेतस्थळावर प्रवेश फेरीची माहिती दिली जाणार आहे. प्रवेश परीक्षा केंद्र शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत येथे होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे.